# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३

जा.क्र.मनपा/वृ.प्रा/ ३०१ /२०२१-२२ दिनांक :- ०५/१०/२०२१

प्रति,
सिस्टम ॲनालिस्ट,
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

**विषय:- संकेतस्थळावर जाहीर नोटीस सुचना प्रसिध्द करणेबाबत.**

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाची मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास कामातील बाधीत होणारी / धोकादायक झाडे मुळासहित काढणेकामाची सोबत जोडलेली जाहीर नोटीस सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा प्रसिध्द करण्यात यावी.

**सोबत :- जाहीर नोटीस प्रत.**

५/१०/२०२१

(कांचन गायकवाड)
सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३

जा.क्र.मनपा/वृ.प्रा / 301 /2021-22 दिनांक :- 05/10/2021

### // जाहिर नोटीस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम 1975 च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या कलम 8(3) अन्वये या नोटीसव्दारे असे जाहिर करण्यात येत की मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकासकामात बाधीत होणारी/धोकादायक झाडे मुळासहित काढणे व पुर्न:रोपन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | संख्या |
|---|---|---|
| 1. | सदरचे झाड भाईंदर (पुर्व) गाळा क्र. 6, विकास उद्योग नगर, फ़ाटक रोड येथिल असुन सदरचे झाड श्रीनाथ पॅकेजिंग या गाळ्याच्या पत्र्यावर पुर्णपणे वाकलेले असुन भिंतीला तडे गेलेले आहेत. या कारणास्तव सदर झाड मुळासहीत काढणे आवश्यक आहे.. **(मे.श्रीनाथ पॅकेजिंग यांचे दि.22/09/2021 रोजीचे पत्र.)** | 01 नग बदाम |
| 2. | सदरचे झाड भाईंदर (प.) पदमावती नगर, 150 रोड, येथील जैन मंदिरच्या समोरील मनपा रोडवरती आहे. रस्त्याच्या कामाकरीता खोदकाम केल्यामुळे झाडाची मुळ उघडी पडलेली आहेत. सदर झाड मुळासहीत काढणे आवश्यक आहे. **(श्री पार्श्व-पदमावती श्वे.मू.पू.जैन संघ यांचे दि.23/09/2021 रोजीचे पत्र.)** | 01 नग रेन्ट्री |
| 3. | सदरचे झाड भाईंदर (पु.) जेसलपार्क, येथील डिवाईन ब्लेसींग सोसायटीच्या समोर मनपा रोडवर वाढलेले असून सदर झाडाचा बुंधा कुजलेल्या स्थितीत आहे. या कारणास्तव सदर झाड मुळासहीत काढणे आवश्यक आहे. **(सन्मा.नगरसेविका सौ.शानु गोहील यांची दि.28/09/2021 रोजीची सुचना)** | 01 नग बोर |
| 4. | सदरचे 01 नग नारळाचे झाड उत्तन, भातोडी बंदर, भाईंदर (प.) येथिल घराच्या आवारात वाढलेले असून सदर झाडावर विज पडुन झाडाचा शेंडा पुर्णपणे जळुन झाड मेलेल्या स्थितीत आहे. या कारणास्तव झाड काढणे आवश्यक आहे **(श्री.रायमन मौजेश थोपेल्या यांचे दि.03/09/2021 रोजीचे पत्र)** | 01 नग नारळ |
| 5. | सदर 1 नग ताडाचे झाड 70 ते 80 फुट उंच असून सदर झाड धोकादायकरित्या उंच वाढलेले असुन बाजुला असणा-या 3 ते 4 घरावर वा-याने झुकत असुन झाडाची मुळे जमिनीवर आलेली असुन जोराच्या वारा-पाऊसाने झाड पडुन जिवित व वित्त हानी होऊ शकते, या कारणास्तव सदरचे झाड काढणे आवश्यक आहे. **(श्री.विल्यम रलसी कोरिया यांचे दि.11/08/2021 रोजीचे पत्र.)** | 01 नग ताड |
| 6. | सदर 01 नग आंब्याचे झाड 20 ते 25 फुट उंच असून सदरचे झाड साई प्रसाद को.ऑ.हौ.सोसायटीच्या आवारातील असुन लक्ष्मी नारायण निवास सोसायटीच्या कंपाऊंडवर वाकलेले आहे. त्यामुळे भिंतीला तडे गेलेले आहेत. या कारणास्तव सदरचे झाड काढणे आवश्यक आहे. **(लक्ष्मी नारायण निवास को.ऑ.हौ.सो.लि. यांचे दि.30/08/2021 रोजीचे पत्र.)** | 01 नग आंबा |
| 7. | सदर 1 नग वडाचे झाड 25 ते 30 फुट उंच असून सदर झाड धोकादायकरित्या गावदेवी मंदिर चौकात वाकलेले असुन झाडाचा बुंधा किड लागुन पोखरलेला आहे. तसेच झाडाची मुळे बाहेर आलेली असुन कठडा तुटलेला असल्याने जोराच्या वारा-पाऊसाने झाड पडुन जिवित व वित्त हानी होऊ शकते, या कारणास्तव सदरचे झाड काढणे आवश्यक आहे. **(श्री.राधाकृष्ण मंदिर मोर्वा यांचे दि.30/08/2021 रोजीचे पत्र.)** | 01 नग वड |
| 8. | सदर 1 नग आंब्याचे झाड 50 ते 55 फुट उंच असून सदर झाड भाईंदर (प.) चौक धक्का, धारावी रोड, दर्गा जवळ, डोंगरी येथे अर्जदार यांच्या घराच्या बाजुला वाढलेले आहे. सदर झाडाला किड लागलेली असून झाड घराच्या बाजुला झुकलेले आहे. जोराच्या वारा-पाऊसाने झाड पडुन जिवित व वित्त हानी होऊ शकते, या कारणास्तव सदरचे झाड काढणे आवश्यक आहे. **(श्रीम.मोमिन हैदर अली शेख यांचे दि.23/09/2021 रोजीचे पत्र.)** | 01 नग आंबा |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची/स्थलांतरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरीकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून 7 दिवसाच्या आत लेखी स्वरूपात उप-आयुक्त (उदयान), उदयान व वृक्ष प्राधिकरण विभाग, पहिला मजला, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे व mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदती नंतर प्राप्त होणाऱ्या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही. तसेच सदरची सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

5.10.2021

(कांचन गायकवाड)
सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका